## ततियो पाठो ।

# महापजापति गोतमी ।

प्रस्तुत पद्य पाठ 'थेरीगाथा' या ग्रंथातून घेतला आहे. या ग्रंथात ७३ थोर स्त्रियांचे स्वकथन शब्दबद्ध केले आहेत. थेरीगाथा हा ग्रंथ 'जगातल्या आद्य कवयित्रींचे भावस्पंदन' आहे. या ग्रंथाला प्राचीनकालीन महिलांच्या स्वातंत्र्याचा दस्तावेज म्हणून संबोधतात. बुद्ध उपदेशाने स्त्रियांचे जीवन कसे उंचावले आणि अर्हतपदाला पोहोचल्यावर जीवनात उच्च प्रतीचा आनंद झाल्यावर स्वकथने केलेली आहेत. बुद्धाच्या प्रेरणेने महापजापतीने पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनासुद्धा प्रव्रज्येचा अधिकार मिळावा या न्याय्य मागणीसाठी लाँगमार्च काढून तो अधिकार प्राप्त केला आणि स्त्रीपुरुष समतेचे पुरस्कर्ते असणाऱ्या बुद्धाने भिक्खूणी संघाच्या स्थापनेस अनुमती दिली. भिक्खूणी होण्याचा पहिला सन्मान महापजापतीला मिळाला. या पाठात तिने दुक्खमुक्त होवून स्वकथन केले आहे.

---

"बुद्धवीर नमो त्यत्थु, सब्बसत्तानं मुत्तमं ।
यो मं दुक्खा पमोचेसि, अञ्ञ ञ्च बहुकं जनं ।।

सब्बदुक्खं परिञ्ञातं, हेतुतण्हा विसोसिता ।
भावितो अरियट्ठङ्गिको मग्गो, निरोधो फुसितो मया ।।

माता पुत्तो पिता भाता, अय्यिका च पुरे अहुं ।
यथाभुच्चं मजानन्ती, संसरि'हं अनिब्बिसं ।।

दिट्ठो हि मे सो भगवा, अन्तिमो'यं समुस्सयो ।
विक्खीणो जातिसंसारो, नत्थि दानिं पुनब्भवो ।।

आरद्धविरिये पहिपत्ते, निच्चं दळहपरक्कमे ।
समग्गे सावके पस्से, एसा बुद्धानं वन्दना ।।

बहून वत अत्थाय, माया जनयि गोतमं ।
व्याधिमरणतुन्नानं, दुक्खक्खन्धं व्यपानुदिं" ति ।।

*(थेरीगाथा)*

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**नमोत्य' त्थु** (नमोते+अत्थु) - त्याला वंदन असो
**मुच** (मञ्चति) (क्रि.) - मुक्त करणे
**परिञ्ञात** (वि.) (परि+ञ्ञात) - संपूर्णपणे जाणले
**अरियट्ठङ्गिको** (अरिय+अट्ठ+अङ्गिको) - आर्य अष्टांगिक मार्ग
**अय्यिका** (स्त्री.) - आर्या, संगोपन करणारी
**संसरि'हं** (संसरि+अहं) - मी भटकत राहिले

**सब्बसत्ता** (पुं.) - (सब्ब+सत्त) - सर्व प्राणी
**अञ्ञञ्च** (अञ्ञं+चं) - आणि दुसऱ्या
**हेतुतण्हा** (स्त्री.) (हेतु+तण्हा) - तृष्णेचे कारण
**निरोधं** (पुं.) - नष्ट करणारा
**यथाभुच्चं** (अ.) (यथा+भुच्चं) - वास्तविकता
**अनिब्बिस** (अ.) - सतत

**अन्तिमो' यं** (अन्तिमो+अयं) - हा शेवटचा
**आरद्धविरिय** (वि.) (आरद्ध+विरिय) - प्रयत्नशील
**निच्चं** (अ.) - नित्य, सतत
**समग्ग** (वि.) - समग्र, संपूर्ण
**वन्दना** (स्त्री.) - उपदेश, मार्गदर्शन, नमस्कार
**व्याधिमरणतुन्नानं** (व्याधि+मरण+तुन्नानं) - दुःख, मृत्यू यांनी परिपूर्ण
**समुस्सय** (पुं.) - समूह, एकत्रित रूप, शरीर, जन्म
**पहितत्त** (वि.) - संयमी
**दळहपरक्कम** (वि.)(दळह+परक्कम) - दृढ पराक्रम
**सावक** (पु.) - श्रावक, उपासक
**जनयि** (क्रि.) - जन्म दिला
**दुक्खक्खन्ध** (दुक्ख+खन्धं) - दुःख समूह
**व्यपानुदि** (क्रि.) - (वि+अप+नुद) - नाश केला

## टीप

**महापजापति गोतमी** - देवदह नगरातील अंजन शाक्याच्या मुलीचे नाव महापजापति होते. ही सिद्धार्थाची आई(महामाया)ची धाकटी बहीण होती. दोघींचेही लग्न राजा शुद्धोदनाबरोबर झाले. सिद्धार्थ जन्माच्या वेळी सातव्याच दिवशी महामाया मरण पावली. तेव्हा महापजापतिनेच सिद्धार्थाचे पालन-पोषण केले. शुद्धोदनाच्या मृत्यूनंतर महापजापतिने संसार त्यागण्याची इच्छा प्रगट केली, परंतु तथागतांनी प्रारंभी अनुमती दिली नाही. आनंदाच्या आग्रहास्तव तथागतांनी अनुमती दिली. इतर स्त्रियांबरोबर सर्वप्रथम महापजापति प्रव्रजित झाली आणि भिक्खूणींचा वेगळा संघ प्रस्थापित झाला. गोतमवंशीय असल्यामुळे महापजापति गोतमी असे नाव रूढ झाले.

## अभ्यास

**१. खालील प्रश्नाचे मराठीमध्ये उत्तर लिहा.**

(१) महापजापति गोतमीचा जीवनवृत्तान्त लिहा.

## टिपण

- बुद्धाच्या उपदेशाने प्रेरित होऊन स्त्रियासुद्धा भिक्खूणी संघाची स्थापना करून दुक्खमुक्त होतात.
- 'अरियट्ठङ्गिको मग्गो' आणि 'नत्थि दानि पुनब्भवो' संकल्पना समजून घेणे.

★★★